# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./ २३० / २०२५ दि. २७/०२/२०२५

## परिपत्रक

विषय:- गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलपीडीत नागरिकांच्या मागण्या पुर्ण करण्याबाबत.

संदर्भ:- १. शासन पत्र क्र. Receipt No. ७६४६५१०/MHT-(EST२) समन्वय दि. १९/१२/२०२४

२. संचालनालयाचे पत्र क्र. - DHEPN-MVI१०११ (CLR)/२०/२०२४-collwgi, Dt-२४.१२.२०२४

३. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र./उशिनाग/संकीर्ण/गोंडवाना/२५ E.Comp.No. ११५९३२२ दि. १७/०१/२०२५

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल पीडीतांच्या पाल्यांना शाळा, कॉलेज, सर्व विद्यापीठासह ज्यांना शासनाचे सहाय्यक अनुदान मिळते अशा सरकारी मालकी आणि नियंत्रण असलेल्या राज्यातील व देशातील शैक्षणिक संस्था, अनुदानित, विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्थांमध्ये मोफत शिक्षणाची सोय आणि वसतीगृह उपलब्ध करुन देण्यात यावे, असे नमुद केलेले आहे. सदर मुद्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णयास अनुसरुन विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये मोफत शिक्षणाची सोय आणि वसतिगृह उपलब्ध करुन देण्याबाबत सर्वकश अहवाल संचालनालयास व शासनास सादर करावयाचा आहे.

करीता संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने वरील मुद्याचे अवलोकन करुन त्याबाबतचा अहवाल दि. ०३/०३/२०२५ पर्यंत महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाच्या college.section@unigug.ac.in या ई-मेल आय.डी. वर तसेच हार्ड कॉपीसह तातडीने विद्यापीठात सादर करावे. सदर माहिती विहीत मुदतीत सादर न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील. करीता नोंद घ्यावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे.

( रविंद्र पी. जुनघरी )
सहायक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये गडचिरोली जिल्हा,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्वियं सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन
**कार्यालय सहसंचालक,उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.**
**जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.**
**(दुरध्वनी क्र.**0712-2561713 **फॅक्स क्र.**0712-2554210
Website.www. jdnagpur.in Email-jdhengp @rediffmail.com

क्र:- उशिनाग/संकीर्ण/गोंडवाना/ /25 E.Comp.No 1159322 दिनांक-17/01/2025

प्रति,
कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषय :- गडचिरोली जिल्हयातील नक्षलपीडीत नागरिकांना मागण्या पुर्ण करण्याबाबत.**
**संदर्भः-** 1.शासन पत्र क्र. Receipt No.७६४६५१०/MHT- (EST२) समन्वय दि.१९.१२.२०२४
2. संचालनालाचे पत्र क्र-DHEPN-MVI1011(CLR)/20/2024-collwgi, Dt-24.12.2024.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्रान्वये, मा. श्री. कृष्णा गजबे, विधानसभा सदस्य यांनी मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांना लिहिलेले दि.२३.६.२०२४ रोजीचे पत्र सोबत जोडले आहे. अवलोकन करावे. तरी सदर पत्रामध्ये नमूद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णयास अनुसरुन विद्यापीठातंर्गत येणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये मोफत शिक्षणाची सोय आणि वस्तीगृह उपलब्ध करुन देण्याबाबत सर्वकश अहवाल तयार करुन संचालनालय व शासनास सादर करावा.

सहपत्र – वरील प्रमाणे

Signed by
Santosh Waghuji Chavan
Date: 17-01-2025 18:00:55
**(डॉ.संतोष चव्हाण)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.